# पुणे महानगरपालिका

## जाहिरात प्रकटन

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील विविध गटातील उमेदवारांची खालील पदांसाठी निवडयादी/प्रतिक्षायादी तयार करणेकरीता खालील प्रमाणे शैक्षणिक पात्रता व अनुभव धारक उमेदवारांकडून अर्ज मागविणेत येत आहेत.

| अ क्र | पदनाम | एकवट वेतन / वेतनश्रेणी | शैक्षणिक पात्रता | पदांची संख्या | गट | खात्याचे नाव | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पर्यावरण संवर्धन अधिकारी | समय वेतनश्रेणी रु. १०००० ते १५२०० + मान्य भत्ते | एम.एस.सी.(पर्यावरण शास्त्र)किंवा एम.ई.(पर्यावरण)नामांकीत संस्थेत पर्यावरण / प्रदूषण क्षेत्रात किमान ३ वर्ष काम केल्याचा अनुभव.संगणक ज्ञान शाखेत डिप्लोमा असलेल्या उमेदवारास प्राधान्य. | १ निवड यादी | खुला | - | ------- |
| २ | वैद्यकीय अधिकारी (वर्ग-२) | प्र.वर्ष रु.१००००द.म. व्दि.वर्ष रु.११०००द.म. तृ.वर्ष रु.१२००० द.म. | एम.बी.बी.एस.उत्तीर्ण. तसेच एम.डी. (स्त्री रोग व प्रसूति शास्त्र) अथवा डी.जी.ओ ही शैक्षणिक पात्रता असणाऱ्या उमेदवारास प्राधान्य | १ प्रतिक्षा यादी | खुला | आरोग्य | ३ वर्षांचे समाधान कारक सेवेनंतर समय वे.श्रे. रु. ८००० ते १३५०० +मान्य भत्ते. |
| ३ | कनिष्ठ अभियंता (विद्युत - वर्ग-३) | प्र. वर्ष रु.४५००द.म. व्दि.वर्ष रु.५०००द.म. तृ.वर्ष रु.५५०० द.म. | बी.ई.(विद्युत) अगर मान्य विद्यापीठाचा तत्सम पदवीधर अगर डी.ई .ई.किंवा सरकारमान्य इन्स्टिट्युटची इलेकट्रीकल इंजिनिअरींग परिक्षा उत्तीर्ण. **<u>इतर पात्रता</u>:-** सरकारी/ निमसरकारी अगर मोठ्या संस्थेतील कामाचा पूर्वानुभव असणाऱ्यास प्राधान्य. | ३ प्रतिक्षा यादी | २ इमाव, १ खुला | सहायक आयुक्त तांत्रिक | ३ वर्षांचे समाधान कारक सेवेनंतर समय वे.श्रे. रु.५५०० ते ९००० +मान्य भत्ते. |
| ४ | अर्किटेक्चरल ड्राफ्टस्मन (वर्ग-३) | प्र.वर्ष रु.५३०० द.म. व्दि.वर्ष रु.५८००द.म. तृ.वर्ष रू.६३०० द.म. | १)बी.आर्च.अगर तत्सम परिक्षा उत्तीर्ण २)सरकारी अगर निमसरकारी कार्यालयाकडील आर्किटेक्चर ड्राफ्टमन कामाचा २ वर्षाचा अनुभव आवश्यक. किंवा १) जी.डी.आर्च.अगर तत्सम परिक्षा उत्तीर्ण २) सरकारी अगर निमसरकारी कार्यालयाकडील कामाचा किमान ५ वर्षाचा अनुभव आवश्यक. | २ निवड यादी | अज-१ खुला-१ | नगर अभियंता (भवन रचना) | ३ वर्षांचे समाधान कारक सेवेनंतर समय वे.श्रे. रु. ५३०० ते ११८०० +मान्य भत्ते |
| ५ | स्टुअर्ड (वर्ग-३) | प्र.वर्ष रु.५००० द.म. व्दि.वर्ष रु.५५०० द.म. तृ.वर्ष रु.६००० द.म. | फार्मासिस्ट कोर्स उत्तीर्ण रजीस्ट्रार फार्मासिस्ट कामाचा ५ वर्षाचा अनुभव. | २ निवड यादी | खुला | आरोग्य | ३ वर्षांचे समाधान कारक सेवेनंतर समय वे.श्रे.रु. ५००० ते १११२५ +मान्य भत्ते. |
| ६ | फार्मासिस्ट (वर्ग-३) | प्र.वर्ष रु.३५०० द.म. व्दि.वर्ष रु.४०००द.म. तृ.वर्ष रु.४५०० द.म. | डीफार्मासिस्ट कोर्स उत्तीर्ण फार्मासिस्ट कामाचा ५ वर्षाचा अनुभव. | १ निवड यादी | अज-१ | आरोग्य | ३ वर्षांचे समाधान कारक सेवेनंतर समय वे.श्रे. रु. ४५०० ते ७००० +मान्य भत्ते. |
| ७ | ज्युनिअर नर्स (वर्ग-३) | प्र.वर्ष रु.३५०० द.म. व्दि.वर्ष रु.४०००द.म. तृ.वर्ष रु.४५०० द.म. | नर्सिंग कौन्सिलमधील सभासदत्व नोंदविलेला फुलट्रेंड नर्सचा कोर्स (जनरल नर्सिंग अँड मिडवायफरी कोर्स) उत्तीर्ण. | ३ निवड यादी | अज-२ भज ब-१ | आरोग्य | ३ वर्षांचे समाधान कारक सेवेनंतर समय वे.श्रे.रु. ४५०० ते ७००० +मान्य भत्ते. |

| अ क्र | पदनाम | एकवट वेतन / वेतनश्रेणी | शैक्षणिक पात्रता | पदांची संख्या | गट | खात्याचे नाव | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | फिल्टर इन्स्पेक्टर (वर्ग-३) | प्र.वर्ष रु.४५०० द.म.<br>व्दि.वर्ष रु.५०००द.म.<br>तृ.वर्ष रू.५५०० द.म. | मान्य विद्यापीठाचा शास्त्र शाखेचा पदवीधर (रसायन शास्त्र हा मुख्य विषय घेतलेला) फिल्टर वॉटर ट्रिटमेंट प्लांट चालविण्याच्या कामाचा ५ वर्षांचा अनुभव. | १ प्रतिक्षा यादी | अज-१ | पाणी पुरवठा | ३ वर्षांचे समाधान कारक सेवेनंतर समय वे.श्रे.रु. ४५०० ते १००५५ +मान्य भत्ते |
| ९ | जेसीबी ऑपरेटर (वर्ग-३) | प्र.वर्ष रु.४५०० द.म.<br>व्दि.वर्ष रु.५०००द.म.<br>तृ.वर्ष रू.५५०० द.म. | एस.एस.सी.अगर तत्सम परिक्षा उत्तीर्ण. (मनपा सेवकांसाठी शिथिलक्षम) जेसीबी मशीन हॉटमिक्स प्लँटवरील २ वर्षांचा अनुभव. चाचणी परिक्षा आवश्यक | ४ निवड यादी | अज-१<br>विजा अ-१<br>इमाव-२ | व्हेईकल डेपो | ३ वर्षांचे समाधान कारक सेवेनंतर समय वे.श्रे. रु. ४५०० ते ७००० +मान्य भत्ते |
| १० | इलेक्ट्रिशियन (वर्ग-३) | प्र.वर्ष रु.४०००द.म.<br>व्दि.वर्ष रु.४५००द.म.<br>तृ.वर्ष रु.५००० द.म. | १)पी.डब्ल्यू.डी.वायरमन परिक्षा प्रथम वर्गात उत्तीर्ण<br>२)विद्युत पर्यवेक्षक परवानाधारक असणे आवश्यक आहे.<br>३)तत्सम कामाचा २ वर्षाचा अनुभव आवश्यक आहे. | ३ प्रतिक्षा यादी | अज-१<br>अजा-१<br>इमाव-१ | विद्युत | ३ वर्षांचे समाधान कारक सेवेनंतर समय वे.श्रे.रु. ४००० ते ९६९५ +मान्य भत्ते. |
| ११ | असिस्टंट इलेक्ट्रिशियन (वर्ग-३) | प्र.वर्ष रु.३०००द.म.<br>व्दि.वर्ष रु.३५००द.म.<br>तृ.वर्ष रु.४००० द.म. | १)इ.७ वी उत्तीर्ण<br>२)पी.डब्ल्यू.डी.वायरमन परिक्षा व्दितीय वर्गात उत्तीर्ण<br>२)तारतंत्री परवानाधारक असणे आवश्यक आहे.<br>३)तत्सम कामाचा ३ वर्षाचा अनुभव आवश्यक आहे. | १६ निवड यादी<br><br>३ प्रतिक्षा यादी | अज-२<br>विजा अ-१<br>भज क-१<br>भज ड-१<br>इमाव-१<br>खुला-१०<br><br>अजा-१<br>इमाव-१<br>खुला-१ | विद्युत | ३ वर्षांचे समाधान कारक सेवेनंतर समय वे.श्रे.रु. ३५४० ते ८१३५ +मान्य भत्ते. |
| १२ | बत्ती इन्स्पेक्टर (वर्ग-३) | प्र.वर्ष रु.३०००द.म.<br>व्दि.वर्ष रु.३५००द.म.<br>तृ.वर्ष रु.४०००द.म. | १) इ.४ थी पास,<br>२) सेकंण्ड क्लास वायरमन लायसेन्स धारक<br>अनुभव:- सरकारी/ निमसरकारी संस्थेतील तत्सम कामाचा ३ वर्षांचा अनुभव आवश्यक. | १ निवड यादी | इमाव | विद्युत विभाग | ३ वर्षांचे समाधान कारक सेवेनंतर समय वे.श्रे.रु. ३५४० ते ८१३५ +मान्य भत्ते. |
| १३ | पेव्हर ड्रायव्हर (वर्ग-३) | प्र.वर्ष रु.३५०० द.म.<br>व्दि.वर्ष रु.४०००द.म.<br>तृ.वर्ष रू.४५०० द.म. | एस.एस.सी.अगर तत्सम परिक्षा उत्तीर्ण. (मनपा सेवकांसाठी शिथिलक्षम) पेव्हर कामाचा ३ वर्षांचा अनुभव. चाचणी परिक्षा आवश्यक | १ निवड यादी | अज-१ | पथ विभाग | ३ वर्षांचे समाधान कारक सेवेनंतर समय वे.श्रे. रु. ३१५० ते ७३०० +मान्य भत्ते (मनपा सेवकांस एकवट वेतनाची अट लागु नाही) |
| १४ | मोटार सारथी/ फायर इंजिन ड्रायव्हर (वर्ग-३) | प्र.वर्ष रु.३००० द.म.<br>व्दि.वर्ष रु.३५००द.म.<br>तृ.वर्ष रु.४००० द.म. | इ.४ थी पास. जड वाहन चालविण्याचा परवाना. वाहन चालविण्याचा ३ वर्षांचा अनुभव. | २४ निवड यादी | अज-५<br>भज क-२<br>भज ड-९<br>विमाप्र-१<br>इमाव-७ | व्हेईकल डेपो | ३ वर्षांचे समाधान कारक सेवेनंतर समय वे.श्रे.रु. ३०५० ते ४५९०+मान्य भत्ते |

**अटी:-**

१) अर्ज करताना उमेदवारांनी जन्मतारखेच्या पुराव्यासाठी जन्म तारखेचा दाखला किंवा शाळा सोडल्याच्या दाखल्याची साक्षांकित प्रत अथवा शालांत परिक्षेच्या उत्तीर्ण सर्टिफिकेटची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

-३/-

२) वयोमर्यादा :- जाहिरातीचे दिनांकास खुला गटातील उमेदवारांसाठी ३३ वर्षे तसेच मागासवर्गीय गटातील उमेदवारांसाठी ३८ वर्षे.अपंग, प्रकल्पगस्त, माजी सैनिक यांसाठी ४५ वर्षे .(वयोमर्यादेबाबत मे.राज्य शासनाचे निर्णय लागू राहतील.)

३) खुल्या गटासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांना रु.१००/- किमतीचे व आरक्षीत गटासाठी अर्ज करणाऱ्या मागसवर्गीय उमेदवारांना रु.५०/- किमतीचे पुणे मनपाचे छापील फॉर्म मा.सह महापालिका आयुक्त यांचे नियंत्रणाखाली **१)** मा.महापालिका सहायक आयुक्त क्र.१. घोलेरोड क्षेत्रिय कार्यालय, घोलेरोड मनपा मुद्रणालया समोर,पुणे ४, **२)** मा.महापालिका सहायक आयुक्त क्र.२. ढोलेपाटीलरोड क्षेत्रिय कार्यालय, ढोलेपाटील मार्केट इमारत,पुणे १.**३)** मा.महापालिका सहायक आयुक्त क्र.३.-कसबापेठ क्षेत्रिय कार्यालय, जुना बाजार रस्ता, शिवजी स्टेडियम शेजारी,कसबापेठ,पुणे ११, **४)** मा.महापालिका सहायक आयुक्त क्र.४.-टिळकरोड क्षेत्रिय कार्यालय, ९९०, शुक्रवारपेठ, शिवाजीराव ढेरे उद्योग भवन टिळकरोड,पुणे ३०. येथे दिनांक २३/८/२००७ ते दिनांक १२/९/२००७ अखेर(पर्यंत)कार्यालयीन कामकाजाचे दिवशी सकाळी ११.०० ते दु. २.०० या वेळेत विकत मिळतील व दिनांक १३/९/२००७ दुपारी ४.०० पर्यंत स्विकारले जातील. सदरचे फॉर्म पोस्टाने अगर व्हिपीने मनिऑर्डर रक्कम स्विकृत करुन पाठविले जाणार नाहीत.

४) **पुणे महानगरपालिकेच्या सेवकांना एकवट वेतनाची व वयाची अट लागू होणार नाही.**

५) **वर नमुद केलेल्या अनुक्रमांक १, २, ३, ४, ५, ६, ७, ८ येथील पदांसाठी मान्य विद्यापीठाची / शासन मान्य संस्थेची संगणक विषयक पदवी /पदवीका अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.**

६) अर्जासोबत शैक्षणिक पात्रतेच्या दाखल्यांच्या प्रमाणित केलेल्या सत्य प्रती(ट्रू-कॉपी) जोडणे आवश्यक आहे. उमेदवार मागासवर्ग गटातील असल्यास जातीच्या दाखल्याची सक्षम अधिकाऱ्याकडून साक्षांकित केलेली प्रमाणित प्रत जोडणे आवश्यक आहे.

**निवड झालेल्या अ.ज. गटातील उमेदवाराने जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय त्यांना संबंधित पदावर रूजू करून घेतले जाणार नाही.**

७) अपुर्ण भरलेले अर्ज अगर वरीलप्रमाणे अर्जासोबत दाखल्याच्या प्रमाणित सत्यप्रती(ट्रू-कॉपी) जोडले नसलेले अर्ज तसेच टपाल खात्याची दिरंगाई वा कोणत्याही कारणास्तव मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

८) रिक्त पदाच्या तुलनेत अधिक अर्ज प्राप्त झाल्यास गुणवत्तेचे योग्य ते निकष लावून उमेदवारांची संख्या मर्यादित करणेसाठी पात्रता (चाळणी) परिक्षा घेण्यात येईल. सदर परिक्षा घेण्याचे अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना राहतील.

९) **उमेदवार महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असावा**.

१०) उमेदवार सरकारी / निमसरकारी किंवा महापालिका सेवेत असल्यास त्यांचे अर्ज त्यांचे खाते प्रमुखांमार्फत सादर करणे आवश्यक आहे.

११) मुलाखतीस बोलाविणेत आलेल्या उमेदवारांना मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

१२) मुलाखतीस बोलाविणेचे अंतिम अधिकार मा.महापालिका आयुक्त यांनी राखून ठेवले आहेत.

१३) मे.महाराष्ट्र शासनाकडील आदेश महिला व बालकल्याण विभाग शासन निर्णय क्र.संकिर्ण-१०९३/प्र.क्र.३६६/का-२ दि.२२/६/९४ महिलांसाठी असणारे आरक्षण अनुज्ञेय राहील.

१४) महिला विवाहित असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक,

१५) शासन आदेशानुसार प्रकल्प ग्रस्तांसाठी आवश्यक असलेले आरक्षण अनुज्ञेय राहील. पुणे जिल्ह्यातील टेमघर प्रकल्पांसाठी प्राधान्य.

१६) शासन आदेशानुसार माजी सैनिक, खेळाडू यांचेसाठी असलेले आरक्षण अनुज्ञेय राहील.

१७) मे.महाराष्ट्र शासनाकडील आदेश क्र.एस.आर.व्ही.-२०००/प्र.क्र.-१७/२०००/१२,दि.१/७/२००५ अन्वये वाढत्या लोकसंख्येला आळा घालण्याच्या दृष्टीने दि.२८/३/२००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या २ पेक्षा अधिक असल्यास संबंधित उमेदवाराचा नेमणुकीसाठी विचार करण्यात येणार नाही व तसे प्रतिज्ञापन संबंधित उमेदवाराने अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

१८) रिक्त जागांच्या संख्येत कमी अधिक बदल होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

१९) पदाच्या आढाव्याअंती सदर पदे अतिरिक्त ठरल्यास मान्यता आदेश आपोआप रद्द होतील.

सही/-प्रविणसिंह परदेशी

**महापालिका आयुक्त**

**पुणे महानगरपालिका**

पुणे

दिनांक :-